दिनांक:- 27 JUL 2016

प्रति

अध्यक्ष/सचिव,

प्रितम मेडिकल फांऊडेशन अॅन्ड रिसर्च सेंन्टर सेन्चुरी एन्का कॉलनी नं. ०३, पुणे नाशिक रोड, भोसरी पुणे-४११०३९

विषय - सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याबाबत....

**संदर्भ :-१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.**

**२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१ दिनांक २०. जुन २०१२.**

**३. शासन निर्णय एसएफएस-१०१६/प्र.क्र.६९/एसएम-२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई-३ दि. १७.०६.२०१६.**

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता.त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक-०३ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| ९१९ | पुणे | प्रितम मेडिकल फांऊडेशन अॅन्ड रिसर्च सेंन्टर सेन्चुरी एन्का कॉलनी नं. ०३, पुणे नाशिक रोड, भोसरी पुणे-४११०३९ | ग्लोबल टॅलेन्ट इंटरनेशनल स्कूल, प्लॉट न. ०१ सें. नं. १३, चिखली प्राधिकरण, ता-हवेली, जि-पुणे ४११०१९ | इंग्रजी | नवीन शाळा (सी.बी.एस.ई) | प्राथमिक (इयत्ता १ ली ते ५ वी ) | २०१६-१७ |

अटी व शर्ती :-

१. प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची/ तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

२. पात्र ठरलेल्या संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुर्दीची पुर्तता करुन सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे.

३. ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बार्बीची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासुन एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्हयांच्या शिक्षणाधिका-यांकडे अर्ज करावेत

४. ज्या व्यवस्थापनास सन २०१६-१७ करिता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बार्बीची पुर्तता करण्यासाठी या शासना निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रददबातल ठरेल

५. सीबीएसई,आयसीएसई,आयबी,आयजीएसई,आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडाळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास /शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून परवानगी (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दिनांक २० जून २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C ) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस मान्यता घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रांसह संस्था संबंधित मंडाळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C ) मिळविणेसाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पुर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C ) प्रमाणपत्र देईल.

६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे,कार्यपध्दतीचे तसेच महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन )मुख्य अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुर्दीचे पालन करणे बंधनकारक राहील.

७. संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुर्दीची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

८. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही, शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रदद समजण्यात येईल.

९. **यु-डायस डाटा- या शासन निर्णयाव्दारे** परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळाबाबत जिल्हानिहाय U-DISE (Unified District Infofmation System For Education) मध्ये माहिती भरताना, **स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा** म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशव्दारावर लावणे आवश्यक राहील.

(दिनकर टेमकर )

शिक्षण उपसंचालक

पुणे विभाग पुणे-१

शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग,
१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com
वेब साईट- WWW.dydepune .com

---

जा.क्र. शिउसं/प्राथ-२०२/मान्यता/पुवि/२०२२ / 924e दिनांक : 09 FEB 20

प्रति,
अध्यक्ष, प्रितम मेडीकल फाऊंडेशन ॲन्ड रिसर्च सेंटर, नेअर सेंचुरी एन्का कॉलनी नं.३, पुणे नाशिक रोड, भोसरी पुणे

विषय :- महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून स्वयंअर्थसहाय्यीत तत्वावर दर्जावाढ शाळा सुरु करण्यासाठी मिळालेल्या शासन मान्यतेचे अनुषंगाने करावयाचे कार्यवाहीबाबते

संदर्भ : १.मा.सहसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,विस्तार भवन,मुंबई-३२ यांचेकडील मान्यता पत्र जा.क्र.एसएफएस-१०२१/प्र.क्र.५८६/एसएम-२, दिनांक ११.१.२०२२

२. अध्यक्ष, प्रितम मेडीकल फाऊंडेशन ॲन्ड रिसर्च सेंटर, नेअर सेंचुरी एन्का कॉलनी नं.३, पुणे नाशिक रोड भोसरी पुणे यांचे दिनांक नसलेले पत्र

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत प्रितम मेडीकल फाऊंडेशन ॲन्ड रिसर्च सेंटर, नेअर सेंचुरी एन्का कॉलनी नं.३, पुणे नाशिक रोड, भोसरी पुणे संचलित ग्लोबल टॅलेंट इंटरनॅशनल स्कूल, प्लॉट नं.०१, स.नं.१३, चिखली प्राधिकरण ता.हवेली जि. पुणे प्राथमिक शाळेला जोडून उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक, ६ वी ते इ. १२ वी, सर्व शाखा इंग्रजी माध्यम, संदर्भीय क्र. १ चे शासन आदेशान्वये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून मान्यता देण्यांत आलेली असून सदर मान्यता आदेशातील अ.क्र. १ ते १३ मुददयाव्दारे नमूद केलेल्या अटी व शर्ती आपल्या संस्थेस/शाळेस बंधनकारक असून त्यानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम २०२० मधील तरतुदीनुसार करण्यांत यावी.

(औदुंबर उकिरडे)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-१

प्रत : माहितीस्तव सविनय सादर
१. मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे तथा अध्यक्ष, राज्यस्तरीय प्राधिकरण
२. मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे
३. कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय,मुंबई,मुंबई-३२.
४. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद, अहमदनगर